# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 16 May 2024

Time: 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १६ मे २०२४ दुपारी १.०० वा.**

****

मुंबईतल्या घाटकोपरमध्ये छेडानगर परिसरात महाकाय फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेतलं बचावकार्य आज सकाळी साडेदहा वाजेदरम्यान संपवण्यात आलं. मुंबई महापालिका आयुक्त भुषण गगराणी यांनी आज पत्रकारांशी बोलतांना ही माहिती दिली. जवळपास ६३ तास चाललेल्या या बचावकार्यात ९१ जणांना सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आलं. सध्या या ठिकाणचा मलबा हटवण्याचं काम सुरु आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधित पेट्रोल पंपाच्या अनुषंगाने फलकासंदर्भातल्या परवानग्या तपासण्यात येत असल्याचं ते यावेळी म्हणाले. शहरात असणाऱ्या अशा पद्धतीच्या सर्व जाहिरात फलकांची तपासणी करण्यात येत आहे. तसंच सर्व बेकायदेशीर फलकांविरोधात कारवाई सुरु असून, सर्व फलकांना स्ट्रक्चरल स्थिरता प्रमाणपत्र आवश्यक असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. दरम्यान, १३ मे रोजी झालेल्या या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाला आहे.

****

यंदाच्या पदवी अभ्यासक्रमासाठीच्या सामायिक विद्यापीठ प्रवेश परिक्षा सीयुईटीत काल ७५ टक्क्यांहून अधिक उमेदवारांनी सहभाग घेतला. काल एकाच दिवशी झालेल्या परिक्षेसाठी, ३७९ शहरात दोन हजार १५७ परिक्षा केंद्रांवर एकूण ११ लाख ४ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. दरम्यान, दिल्ली केंद्रासाठी काल होणारी ही परिक्षा काही अपरिहार्य कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली असून आता ही परिक्षा २९ मे रोजी होईल.

****

शेतकऱ्यांच्या तक्रार निवारणासाठी कृषि विभागामार्फत विभाग आणि प्रत्येक जिल्हास्तरावर निविष्ठा तक्रार निवारण कक्ष सुरु करण्यात आला आहे. ठाण्याचे कोकण विभागीय कृषी सहसंचालक अंकुश माने यांनी ही माहिती दिली आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणं, खतं, किटकनाशकं आदींबाबत उदभवणाऱ्या अडचणींचं निराकरण व्हावं, तसंच काळाबाजार आणि साठेबाजीला आळा बसण्याच्या उद्देशाने हा कक्ष सुरु करण्यात आला आहे.

****

राष्ट्रीय डेंग्यू दिवस आज पाळला जात आहे. यानिमित्त छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सर्व शासकीय आरोग्य संस्थेत विविध जनजागृतीपर कार्यक्रम होत आहेत. नागरिकांनी घरात कोणतेही साठविलेलं पाणी आठ दिवसांपेक्षा जास्त काळ ठेवू नये, पाणी साठवणुकीचं भांडं आठवड्यातून एकदा रिकामं आणि कोरडं करुन भरावं तसंच डेंग्यू ताप टाळण्यासाठी नागरिकांनी खबरदारी घ्यावी, असं आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर यांनी केलं आहे. डेंग्यु संदर्भात इंडिया फाईट डेंग्यू हे मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्यात आलं असून या ॲप्लिकेशनचा नागरिकांनी वापर करावा,  डासांच्या उत्पत्तीवर नियंत्रण मिळविण्यासाठी नागरिकांनी आरोग्य यंत्रणेला सहकार्य करावं असंही त्यांनी म्हटलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात पाणीटंचाई निवारण्याची कामं लोकसहभागातून हाती घ्यावीत असं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी म्हटलं आहे. अशा कामांना शासकीय यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्थामार्फत सहकार्य करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं आहे. अनेक तालुक्याच्या ठिकाणी बैठका घेवून उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणाना त्यांनी दिल्या आहेत.

****

लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवडीवर भर देण्यात येणार असून यंदाच्या पावसाळ्यात जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून त्याचं संवर्धन करण्याचा संकल्प प्रत्येकानं करावा, असं आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केलं आहे. वृक्षलागवड या चळवळीला लोकचळवळीचं स्वरुप येणं गरजेचं आहे. यासाठी माय गार्डन, माय प्राईड मोहीम राबविण्यात येईल. तसंच स्वयंसेवी संस्थांनी शहरी भागात रस्त्यांच्या दुतर्फा वृक्ष लागवड करून ग्रीन कॉरिडोर निर्माण करण्याची संकल्पना राबवावी असं त्यांनी यावेळी सांगितलं.

****

मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात आणि विदर्भात आज आणि उद्या जोराचे वारे, वीजा, गारपीटींसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

****

यंदाच्या टी–ट्वेंटी विश्वचषक दरम्यान, भारतीय सांकेतिक भाषा आणि ऑडिओ वर्णनात्मक समालोचन प्रदान करण्यासाठी इंडिया साइनिंग हँड्स प्रायव्हेट लिमिटेडसह अनेक खाजगी क्रीडा वाहिनींच्या सहकार्याबद्दल माहिती आणि प्रसारण मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी कौतुक केलं आहे. समाज माध्यमावरील आपल्या संदेशात त्यांनी, सरकारच्या सर्वसमावेशकतेच्या दृष्टीकोनातून हे एक महत्वाचं पाऊल असल्याचं म्हटलं आहे.

****

व्हिएतनाम इथं सुरु असलेल्या आशियाई तायक्वांदो स्पर्धेत भारताला दुसरं पदक प्राप्त झालं आहे. सीता, हर्षा सिंघा आणि उषा धामणस्कर या तिन्ही खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी नोंदवत पुमसे खेळ प्रकारात भारतीय संघाला रौप्यपदक मिळवून दिलं. या खेळाडूंनी ३० गुणांची कमाई करत पदक प्राप्त केलं. १४ मे रोजी मंगळवारी स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी अरुणाचल प्रदेशच्या रुपा बायोर हिनं पुमसे गटात कांस्यपदकाची कमाई केली होती. ही स्पर्धा १८ मेपर्यंत चालणार आहे.

****